# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

**Dr. Priya Gedam**
**Director Students' Development (I/c.)**
**Mo. No. - 9049474119**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org
Email : director.dsd@unigug.ac.in


**पत्र क्र. No.GUG/DSD-/304/2023** **Dt:13 /11/2023**

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालय/विभाग प्रमुख
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :— राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महारष्ट्र शाखेतर्फे राज्यशास्त्र व लोकप्रशासन या विषयाचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थी (एम. ए. राज्यशास्त्र) व अधिव्याख्यातासाठी संसदीय कार्यप्रणाली आणि प्रथा या विषयावरील अभ्यसवर्गासाठी राज्यशास्त्राचे ०६ विद्यर्थी व ०१ अधिव्याख्याता नामनिर्देशीत करण्याबाबत.**

**संदर्भ :—राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र राज्य क्रमांक:१६०२६/म. वि.स/राजशिष्टाचार/सीपीए/२७/१०/२०२३.**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीत विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधान मंडळाचे हिवाळी अधिवेशन गुरूवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०२३ रोजीपासून विधान भवन, नागपूर येथे सुरू होणार आहे. अधिवेशन कालावधीत राज्यशास्त्र व लोकप्रासान या विषयाचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थी व अधिव्याख्याता यांना संसदीय शासन प्रणालीच्या विविध पैलुची तसेच सभागृहात चालणाऱ्या संसदीय कामकाजाची माहीती व्हावी या उद्देशाने संसदीय कार्यप्रणाली आणि प्रथा या विषयावरील अभ्यास वर्गात सहभागी होण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील (एम. ए भाग १ राज्यशास्त्र) चे ०६ विद्यार्थी व ०१ अधिव्याखाता नामनिर्देशीत करावयाची आहे त्याकरीता विद्यार्थ्यांची नावे व ईच्छुक प्राध्यापकांनी (राज्यशास्त्र व लोकप्रशासन या विषयातील ) आपले नावे संपूर्ण माहितीसह व दोन पासपोर्ट आकाराची छायाचित्र director.dsd@unigug.ac.in / dsd.gug123@gmial.com या ई—मेल वर व संचालक विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कार्यलय प्रत्यक्ष यांना दि. ०६/११/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत पाठवावे. प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून छाननी करून त्या ०६ विद्यार्थ्यांना व ०१ अधिव्याख्याता यांना संसदीय कार्यप्रणाली आणि प्रथा या विषयावरील अभ्यासवर्गा करीता पाठविण्यात येईल यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

धन्यवाद!

(डॉ. श्याम खंडारे)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग

**Commonwealth Parliamentary Association, Maharashtra Branch**
MAHARASHTRA LEGISLATURE SECRETARIAT
Vidhan Bhavan, Mumbai 400 032 (INDIA)
Tel. +91-22-22027399
Facsimile : + 91-22-22820820/22024212
Email : mahacpa52@gmail.com

CPA COMMONWEALTH PARLIAMENTARY ASSOCIATION

**राष्ट्रकुल संसदीय मंडळ**
**महाराष्ट्र शाखा**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२०२७३९९
फॅक्स क्रमांक : ०२२-२२८२०८२०/
२२०२४२१२

क्रमांक : १६०२६/म.वि.स/राजशिष्टाचार/सीपीए.

दिनांक : 27 OCT 2023

प्रेषक :

सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय व
सचिव, राष्ट्रकुल संसदीय मंडळ,
महाराष्ट्र शाखा, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.

प्रति :

मा.कुलसचिव,

(१) मुंबई विद्यापीठ, मुंबई.
(२) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
(३) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
(४ )डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
(५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
(६) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
(७) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
(८) एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ, मुंबई.
(९) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
(१०) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.
(११) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
(१२) गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

विषय :- राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे राज्यातील विद्यापीठांतील "राज्यशास्त्र व लोकप्रशासन" या विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थी व अधिव्याख्यात्यांसाठी "संसदीय कार्यप्रणाली आणि प्रथा" या विषयावरील अभ्यासवर्ग.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाधीन विषयाबाबत निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन **गुरुवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०२३ रोजीपासून विधान भवन, नागपूर येथे सुरु होणार आहे.** दरवर्षी नागपूर येथील अधिवेशन कालावधीत राष्ट्रकुल संसदीय मंडळ, (सीपीए) *(Commonwealth Parliamentary Association – CPA, Maharashtra Branch)* महाराष्ट्र शाखेतर्फे; राज्यातील सर्व विद्यापीठांतील **"राज्यशास्त्र व लोकप्रशासन"** या विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थी व अधिव्याख्याते यांना संसदीय शासनप्रणालीच्या विविध पैलूंची तसेच सभागृहांतील संसदीय कामकाजाची प्रत्यक्ष माहिती व्हावी या उद्देशाने **"संसदीय कार्यप्रणाली आणि प्रथा"** या विषयावर

..२/-

एक अभ्यासवर्ग आयोजित करून त्याद्वारे नामवंत संसदपटू/लोकप्रतिनिधी/विशेषज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात येतात. सदर उपक्रम सन १९६४ पासून अव्याहतपणे राबविला जात आहे. त्यानुसार यावर्षीही **सोमवार, दिनांक ११ डिसेंबर ते सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२३ या कालावधीत** विधान भवन, नागपूर येथे ५० वा संसदीय अभ्यासवर्ग आयोजित करण्यात येणार आहे.

**या अभ्यासवर्गासाठी आपल्या विद्यापीठामार्फत एकूण फक्त ६ विद्यार्थी व १ अधिव्याख्याता पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी ही विनंती.( राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर १५ विद्यार्थी व १ अधिव्याख्याता )**

राज्यशास्त्र व लोकप्रशासन हे विभाग जेथे वेगळे आहेत अशा विद्यापीठांनी परस्पर समन्वयाद्वारे नावे निश्चित करावीत. **सर्वच विद्यापीठांनी नावे निश्चितीचे वेळी जिल्हा व तालुकास्तरीय विद्यार्थ्यांना प्राधान्य देऊन त्यांच्याही नावांचा समावेश करावा. तसेच ससंदीय अभ्यासवर्गात कोणत्याही विद्यार्थी व अधिव्याख्यात्यांचा दुसऱ्यांदा समावेश करु नये.**

संसदीय अभ्यासवर्गाचा उद्देश हा जास्तीत जास्त विद्यार्थी व अधिव्याख्यात्यांना संसदीय कार्यप्रणालीची ओळख करुन देणे तसेच, सभागृहांच्या कामकाजाच्या अवलोकनाची सुसंधी उपलब्ध करुन देणे असा आहे.

### संसदीय अभ्यासवर्गाची वैशिष्ट्ये/सूचना

(१) संसदीय अभ्यासवर्गाचा कालावधी सर्वसाधारणपणे आठ दिवसांचा असेल.

(२) सर्व विद्यापीठांनी पत्रामध्ये दूरध्वनी, फॅक्स क्रमांक, आपला ई-मेल पत्ता तसेच समन्वय अधिकाऱ्यांचा संपर्क क्रमांक लिहिणे अनिवार्य असून विद्यार्थी संख्येबाबत असलेल्या मर्यादेतच नावे पाठविणे आवश्यक आहे.

(३) अभ्यासवर्गासाठी अधिव्याख्याता व विद्यार्थी यांची नावे पाठवितांना त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांकसुद्धा कळविणे आवश्यक आहे. जेणेकरून त्यांचे समवेत संपर्क साधून नागपूर येथील वाहन, निवास इत्यादीबाबत व्यवस्था करणे सोयीचे होईल.

(४) अभ्यासवर्गासाठी निश्चित केलेले अधिव्याख्याते व विद्यार्थ्यांची अचूक नावे *(सर्व नावे मराठीतच कळविण्यात यावीत)* व त्यांची पासपोर्ट आकारातील दोन रंगीत छायाचित्रे *(छायाचित्रांच्या मागे संबंधितांचे नाव लिहिणे आवश्यक आहे.)* पाठविण्यात यावीत. अभ्यासवर्गास उपस्थित राहणारे अधिव्याख्याते/विद्यार्थी यांनी विद्यापीठाचे अधिकृत ओळखपत्र जवळ बाळगणे अनिवार्य आहे.

(५) अभ्यासवर्गाचे उद्घाटन झाल्यानंतर एकत्रित छायाचित्र घेण्यात येईल.

(६) दर दिवशी संसदीय कार्य प्रणालीशी संबंधित महत्वाच्या विषयांवर मान्यवर वक्त्यांची भाषणे व नंतर प्रश्नोत्तरे.

(७) दुपारच्या सत्रात विधानमंडळ सदस्यांसोबत अनौपचारिक चर्चासत्र.

(८) अभ्यासवर्ग कालावधीत महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद सभागृहांतील प्रत्यक्ष कामकाजाचे दररोज अवलोकन.

(९) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाव्यतिरिक्त इतर विद्यापीठांतील अधिव्याख्याते व विद्यार्थी यांची अभ्यासवर्ग कालावधीत निवास व प्रवास व्यवस्था सीपीए, महाराष्ट्र शाखेद्वारे करण्यांत येईल.

(१०) अभ्यासवर्गासाठी उपस्थित असलेल्या सर्व विद्यापीठांच्या सर्व अधिव्याख्यात्यांना व विद्यार्थ्यांना ₹ ७००/- याप्रमाणे दैनिक भत्ता देण्यात येईल.

(११) **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाव्यतिरिक्त इतर विद्यापीठांतील अधिव्याख्याते व विद्यार्थी यांना नागपूर येथील दोन्ही वेळेच्या प्रवासाकरिता विद्यापीठाजवळचे रेल्वे स्थानक ते नागपूर या दरम्यानच्या रेल्वेचे द्वितीय वर्गाचे प्रवास भाडे देण्यात येईल.** ***(रेल्वे/बसचे तिकीट राजशिष्टाचार/सीपीए कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक असेल.)***

..३/-

(१२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे अधिव्याख्याते व विद्यार्थी यांना अभ्यासवर्गाचे कालावधीकरिता एकूण प्रत्येकी ₹ १०००/- (निश्चित दराने) याप्रमाणे प्रवास भत्ता देण्यात येईल.

(१३) अधिव्याख्यातांना / विद्यार्थ्यांना रेल्वेचे कोणत्याही वातानुकुलीत वर्गाचे अथवा बसच्या स्लीपर कोचचे प्रवास भाडे अनुज्ञेय नाही.

(१४) संपूर्ण अभ्यासवर्गात प्रत्यक्ष सहभागी होणारे अधिकृत अधिव्याख्याते व विद्यार्थी यांनाच प्रमाणपत्र देण्यात येईल.

(१५) प्रस्तावित संसदीय अभ्यासवर्गात दुस-यांदा सहभागी होणारे अधिव्याख्याते व विद्यार्थी यांचा सहभाग आपोआपच रद्द समजण्यात येईल व त्यांना कोणत्याही प्रकारचा दैनिक भत्ता / प्रवास भाडे / प्रमाणपत्र देय असणार नाही.

(१६) सर्व सहभागी अधिव्याख्याते व विद्यार्थी यांनी रविवार, दिनांक १० डिसेंबर, २०२३ रोजी नागपूर येथे पोहोचणे आवश्यक आहे. तसेच सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी (दुपारी ०३.०० नंतर) निर्गमनाचा दिवस राहील. सर्व सहभागी अधिव्याख्याते व विद्यार्थी यांनी; या सचिवालयाकडून कळविण्यात आलेल्या दिनांकास नागपूर येथे पोहोचणे आवश्यक आहे.

अत: यापूर्वी ज्या अधिव्याख्यात्यांनी व विद्यार्थ्यांनी या संसदीय अभ्यासवर्गाचा लाभ घेतलेला नाही फक्त अशाच अधिव्याख्याते/ विद्यार्थ्यांची नावे अभ्यासवर्गासाठी सुचविण्यात यावीत. तसेच उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा व तालुकास्तरीय विद्यार्थ्यांचाही त्यात समावेश करावा.

अधिव्याख्याते/विद्यार्थ्यांची नावे, संपर्क क्रमांक तसेच प्रवासाचा तपशील इत्यादी शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत अवर सचिव (समिती), कक्ष क्रमांक,८०४, (८ वा मजला) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई-४०० ०३२ या पत्त्यावर तसेच ई-मेल पत्ता :- mahacpa52@gmail.com येथे तातडीने पाठविण्यांत यावा.

विहित केलेल्या मुदतीनंतर म्हणजेच शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०२३ रोजी नंतर प्राप्त झालेल्या नावांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही, याची कृपया सर्व विद्यापीठांनी नोंद घ्यावी ही विनंती.

आपली,

प्रा.कुलकर्णी

( प्राजक्ता कुळकर्णी )
अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
भ्रमणध्वनी क्र. ९५९४४ ४०३२७
**Email :** mahacpa52@gmail.com